महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दुरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**कालमर्यादित : दि. १५.०१.२०२१ पर्यंत**

जा.क्र.तंशिविकापू/विवि-३/औमाप्र/२०२०-२१/ 207
दिनांक : 12 JAN 2021

प्रति,
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त,
सर्व विद्यामान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग, पुणे

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताच्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत..**

संदर्भ :- १) मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र २(३)/एनजीसी/मान्यता/ पीसीआय/ २०२०/२५, दिनांक ०८/०१/२०२१

२) मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र २(३)/एनजीसी/मान्यता/ पीसीआय/ २०२०/२६, दिनांक ०८/०१/२०२१

३) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र F.NO,3-52/2020-PCI/ ७६५६, दिनांक ३०/१२/२०२०

४) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र F.NO,3-52/2020-PCI/ ७६८० दिनांक ३०/१२/२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्रमांक १ व २ च्या पत्रांस अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सुचनेद्वारे विद्यमान संस्थांना त्यांचे पोर्टलवर दिनांक ०४/०१/२०२१ ते ३१/०१/२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यास सूचित केले आहे. त्याकरीता खालील अर्जांसाठी राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केलेले आहे –

१. नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे (Introduction of B.Pharmacy New Course)
२. संस्थेच्या/ट्रस्टच्या नावात बदल करणे (Change in Name of Institute/Trust)
३. संस्थेच्या पत्ता/ठिकाण बदल करणे (Change of address/ Location of Institution)
४. संस्था बंद करणे (Closure of Institution)

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व विद्यमान पदवी,पदविका,पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थापैकी ज्या संस्था वरील अर्ज फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचे कडे करणार आहेत. अशा संस्थांनी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दिनांक २२/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह दिनांक १५/०१/२०२१ पर्यंत या कार्यालयास सादर करावा जेणे करुन आपल्या संस्थांकडून प्राप्त झालेले प्रस्तावांची समितीमार्फत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांचे मानकाप्रमाणे तपासणी करुन तपासणी अहवाल या कार्यालयाच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दिनांक १८.०१.२०२१ रोजी संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

**संचालनालयाने दिलेल्या दिनांक १५/०१/२०२१ या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी विलंब झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घ्यावी.**

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : संदर्भिय पत्रांच्या छायांकित प्रती

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597442, 443, 450
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
तात्काल

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/पीसीआय/२०२०/२५
दिनांक : 08 JAN 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताच्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत.....

संदर्भ :- १) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. F.No.३-५२/२०२०-PCI/७६५६, दि. ३०.१२.२०२०
२) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. F.No.३-५२/२०२०-PCI/७६८०, दि. ३१.१२.२०२०

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे विद्यमान संस्थांना त्यांचे पोर्टलवर दिनांक ०४.०१.२०२१ ते दि. ३१.०१.२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यास सूचित केले आहे. संदर्भीन पत्राचे अवलोकन करता खालील अर्जासाठी राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केलेले आहे.

- नवीन बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे [Introduction of B. Pharmacy New Course]
- संस्थेच्या / ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in Name of Institution / Trust]
- संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution]
- संस्था बद करणे [Closure of institution]

राज्यातील विद्यमान पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी औषनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थापैकी ज्या संस्था वरील अर्ज फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचेकडे करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह दि. १५.०१.२०२१ पर्यंत सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करण्यात यावा. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थाना आपले स्तरावरुन अग्रेषित करावे.

f:\vijay_06022018\kedare\approval process\2021\cercular.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादीत
दि. १८.०१.२०२१

क्रमांक:२/एनजीसी/न.प्र.त/२०२०/२६

दिनांक : 08 JAN 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताच्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

---

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली

संदर्भ :- १) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. F.No.३-५२/२०२०-PCI/७६५६, दि. ३०.१२.२०२०
२) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. F.No.३-५२/२०२०-PCI/७६८०, दि. ३१.१२.२०२०
३) या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक क्रमांक २/ एनजीसी/ मान्यता/ पीसीआय २०२०/२५ दि. ०८/०१/२०२१

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे विद्यमान संस्थांना त्यांचे पोर्टलवर दिनांक ०४.०१.२०२१ ते दि. ३१.०१.२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यास सूचित केले आहे. फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी ज्या अर्जांसाठी राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे, अशा संस्थांना राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव आपले कार्यालयात दि. १५.०१.२०२१ पर्यंत जमा करण्यास संदर्भ क्रमांक ३ अन्वये सुचित केले आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी आपले कार्यालयात प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क घेण्यात यावे. तसेच सदर प्रस्तावांची त्रिसदस्यीय तपासणी समितीमार्फत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांचे मानकाप्रमाणे तपासणी करुन तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि. १८.०१.२०२१ रोजी खास दुतामार्फत या संचालनालयास निश्चितपणे सादर करण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

f:\vijay_06022018\kedare\approval process\2021\cercular.docx